## ज्ञानाची शेती – भाग सात

## " एकात्मिक शेती → विषमुक्त शेती → चांगल्या कृषी पद्धती (GAP) → सेंद्रिय शेती "

श्री. अंकुश बरडे, एम.एस.सी. (कृषी)

ज्ञानाची शेती या सदरामधील हा शेवटचा म्हणजेच सातवा भाग आज आपण पाहणार आहोत. आज पर्यंतच्या भागात आपण भारतामधील विशेष करून शेतीमधील हरितक्रांतीच्या पूर्वीची शेती व हरितक्रांतीच्या नंतरची शेती यांचे अवलोकन केले आहे. हरितक्रांती नंतरच्या शेतीमध्ये कशी स्थित्यंतरे घडत गेली, हरितक्रांतीची सुरुवात, मध्य व हरितक्रांतीचा आत्ताचा सुरू असलेला प्रवास, या प्रवासात खरंच कोणत्या शेती पद्धती मधून उत्पादन वाढीसोबतच मानव, पाणी, सूक्ष्मजीव, जलचर, निसर्ग व एकंदरच परिसंस्थेवर विपरीत परिणाम न करता उत्पादन तर वाढत राहील व उत्पादन खर्चात बचत होईल आणि यातून शाश्वत विकासाकडे वाटचाल केली जाईल याबाबत विचार करण्याची वेळ आलेली आहे. यासाठी आपणास यापुढील शेतीची वाटचाल करण्यासाठी व ही विकासाची वाटचाल करत असताना पर्यावरणाचे संवर्धन करत , एकूणच आपले अस्तित्व टिकवुनच नव्हे तर समृद्ध करून पुढच्या पिढीसाठी एक समृद्ध वारसा सोपवणार आहोत.

आज शेतीची विभागणी केली तर यामध्ये प्रामुख्याने शेतात राबणारी मंडळी, शेतीवर फक्त मार्गदर्शन करणारी मंडळी असे दोन भागात करता येतील, यात ग्राहकाचा कोणताही विचार होत नाही, परंतू ग्राहकालाही यामध्ये आपला काही संबंध आहे असे वाटत आहे. कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, कृषी विभाग या संस्था अपुऱ्या मनुष्यबळा अभावी, निधीच्या अडचणींमुळे, विविध राजकीय गटा - तटाच्या राजकारणामुळे व स्वतःच्या कर्तव्याचा भाग विसरल्यामुळे दिशाहीन मार्गक्रमण करत आहोत. सदर संस्था स्वतःचे सत्व हरवून, हतबल आहेत. कृषी विज्ञान केंद्रे जरी केंद्र शासनाचे अधिपत्याखाली असली तरी ती राजकारण्यांचे स्वतंत्र सवते सुभे तयार झाले आहेत. काही सन्माननीय अपवाद वगळता केवळ आपले साम्राज्य सांभाळत फुटकळ प्रदर्शन, प्रशिक्षण व रोपे कलमे, निविष्ठा विक्री केंद्रे झालेली आहेत. कृषी विभागाचे जर विश्लेषण करावयाला घेतले तर कोळसा कितीहि उगळला तरी तो काळाच निघतो ही वस्तुस्थिती आहे. आज कृषी विभागाचे मूल्यमापन केल्यास असे दिसून येते की, कृषी विभागांची स्वतःची मूळ कर्तव्य कोणती याचा विसर पडला आहे याबाबतचा कानोसा घेतला तर त्याबाबत वरिष्ठ पातळीवर सुद्धा अनभिज्ञता जाणवते. कृषी विभागाची मुख्य कामे ही तंत्रज्ञान विस्तार, फलोत्पादन आणि मृद व जल संधारण ही आहेत. त्यामध्ये प्रगत ज्ञानाचा प्रसार व प्रचार ( Lab to Land ) हे मुख्य कर्तव्याचा प्रामुख्याने विसर पडला आहे. तसेच कृषी विद्यापीठाकडून काही नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान निर्मिती, शिफारसी होत नाहीत आणि त्यामुळे कृषी विभागासाठी शेतकऱ्यांना पोहोचण्यासाठी काही काम राहत नाही अशी एकंदर सद्यस्थिती आहे त्याचवेळी स्वतः प्रगतशील शेतकरी, खाजगी निविष्ठा उत्पादक वेगवेगळे प्रयोग करत आहेत व फार मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य शेतकरी त्यांचा अवलंब करत आहेत, परंतु शासकीय यंत्रणा याबाबत बघ्याची भूमिका घेत आहेत. खाजगी बियाणे, कीडनाशके, रासायनिक खते उत्पादक रोज नवनवीन उत्पादने बाजारात विक्रीसाठी आणत आहेत, त्यांचा अत्यंत प्रभावी व जोरकस प्रचार व प्रसार करून ते शेतकऱ्यांना विक्री करीत आहेत. प्रसंगी विक्रेत्यांना मोठ्या प्रमाणात प्रलोभने दाखवून या नवनवीन निविष्ठांचा खप कसा वाढेल यासाठी बाजाराचे तंत्र वापरून, ती शेतकऱ्यांनी वापरावीत यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या सर्व बाजार केंद्रित खाजगी उद्योगांचे निविष्ठा विक्री व वापर याबाबत कृषी विभाग " परवाने राज " मध्ये दंग

असून कृषी विद्यापीठे हातावर हात मारून बघ्याची भूमिका घेऊन बसले आहेत, आणि या सर्व नवीन उत्पादनाच्या तांत्रिक बाजूची माहिती न घेता शेतकरी त्यांचा मोठ्या प्रमाणात वापर करत असून त्यातून उत्पादन किती वाढते त्यापेक्षा शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च मात्र वाढत आहे. नवनवीन निविष्ठा वापरल्याने उत्पादनात वाढ होत आहे की नाही ? याबाबत शेतकरी अनभिज्ञ असून रोज नवनवीन प्रयोग आपल्या शेतात करत आहे आणि प्रयोग करण्यासाठी ज्यांना नेमले आहे ते मात्र या बाबत शांत आहेत.

कृषी विभागाचे दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे राज्यात फलोत्पादन क्षेत्रात वाढ करणे, उत्पादन आणी उत्पादकता वाढविणे. 1990 मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड ही योजना राबविल्यामुळे आज फळे बाजारात दिसत आहेत व त्यांची निर्यातही आपण करत आहोत पण दुर्दैवाने त्यानंतर मात्र कोणतीही नवीन प्रभावी योजना शेतकऱ्यांच्या फायद्याची तयार झाली नाही. केंद्र पुरस्कृत महात्मा गांधी रोहयो सुरू आहे परंतु त्यामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात अटी, शर्ती आहेत की त्याची पूर्तता करता - करता शेतकरी व राबविणारे कर्मचाऱ्यांची दमछाक होत आहे. त्यात पुन्हा ही योजना महसूल, ग्रामविकास व कृषी विभागामार्फत राबवली जाते. या यंत्रणामध्ये समन्वय साधून शेतकऱ्यांसाठी कोण काम करणार हा मोठा प्रश्न आहे.

कृषी विभागाचे तिसरे काम होते मृद व जलसंधारण करण्याचे मृद व जलसंधारणाची कामे महाराष्ट्रात खूप मोठ्या प्रमाणात रोजगार हमी योजना, एकात्मिक पाणलोट विकास योजना, जलयुक्त शिवार योजना इत्यादी योजनांमधून झाली आहेत. आज जे काही पाणी, माती व शेती शिल्लक दिसत आहे, ती केवळ या योजना राबविल्याने दिसत आहे, अन्यथा महाराष्ट्राचा वाळवंट झालेला दिसून आला असता. परंतु ही योजना ही कामापेक्षा इतर बाबीसाठी मोठ्या प्रमाणात सुपरिचित झाली आणि आज मृद व जलसंधारणासाठी कोणतीही योजना कार्यरत नसून ते राबवण्यात कृषी विभागही तेवढा सक्षम व इच्छुक नाही.

कृषी विभागांचे वरील 3 मूलभूत कामांव्यतिरिक्त इतर छोटी मोठी कामे करून घेण्यात शासन व वरिष्ठ अधिकारी गर्क आहेत जसे की पेरणी अहवाल, पीएम किसान, विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजना राबविणे इत्यादी. कृषी विभाग सध्या राबवत असलेल्या योजनांचा प्रत्यक्ष व दृश्य फायदा फारच कमी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतो व या अशा फुटकळ कामात कृषी विभाग गुंतून पडला आहे. या योजनासाठीची तरतूद खूपच कमी प्रमाणात असून पारदर्शकतेच्या नावाखाली सर्व काही ऑनलाईन पोर्टलवर कागदपत्रे, तपासण्या इत्यादींची कामे केली जात आहेत. त्यातही 10 ट्रॅक्टर साठीचा लक्षांक असेल तर 500 अर्ज प्राप्त होतात ते मिळवण्यासाठी एक - दोन वर्षे वाट बघावी लागते. आणि 3 ते 4 वेळा सेतू सुविधा केंद्रात जाऊन दरवेळेस 300 ते 500 रुपयाची रक्कम शेतकऱ्यांना मोजावी लागते. सेतू सुविधा केंद्राची उपलब्धता, इंटरनेट कनेक्शन व विद्युत पुरवठा याबाबत तर आणखीनच आनंद यात शेतकऱ्यांचा किती वेळ, श्रम व पैसा खर्च होतो याचा विचार करावा आणि अशा फुटकळ योजनांच्या नादी लागून शेतकरी गरज असलेले आणि नसलेली अवजारे विकत घेऊन बँक व फायनान्स कंपन्याचे बोजे 7/12 वर वाढवत चालला आहे.

औजारे, ठिबकसंच, फळबाग लागवड इत्यादीचा लक्षांक देण्याबाबतच्या योजना व त्यांचे मार्गदर्शक सूचनांचा एखाद्या तज्ञांना अभ्यास केला तर कळून येईल की या योजना खरंच शेतकऱ्यांसाठी आहेत की बाजार व्यवस्थेला चालना देण्यासाठी. उदाहरणादाखल ट्रॅक्टर, एक छोटा ट्रॅक्टर घेण्यासाठी शेतकऱ्याला 1 ते 1.25 लक्ष रुपये अनुदान दिले जाते तेही वर नमूद केलेले सर्व उपदव्याप झाल्यावर. ( ट्रॅक्टर सोबत आवश्यक प्रत्येक अवजाराला 30% ते 40% अनुदान तेही वेगळे वेगळे अर्ज करून व त्यांचा नंबर आल्यावर ) सद्यस्थिती 30 HP च्या ट्रॅक्टरची किंमत सर्वसाधारणपणे 5 लाख असून त्यासोबत शेतकऱ्याला पेरणी यंत्र, रोटावेटर, नांगर, कुळव,

सरी यंत्र इत्यादी सामग्री घ्यावी लागते आणि या सर्व यंत्र व अवजारावर 28% जीएसटी भरावा लागतो. डिझेल, मशिनरी पार्टवर पण पुन्हा वेगवेगळे कर द्यावे लागतात आणि हे सर्व 30% ते 40% सबसिडीसाठी. एकंदरच शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या ट्रॅक्टरचे अनुदान त्यातून शासनास मिळणारा कर, बँका व फायनान्स कंपनीस मिळणारे व्याज याचा तज्ञांनी अभ्यास करावा आणी याबाबतची सत्यता सर्वांसमोर आणावी नाहीतरी हा सर्व आतबट्यांचा व्यवहार होत आहे. हे सर्व सुरु ठेवण्याचा शासनाचा उद्देश विकास व्हावा, बाजारपेठांचा खप वाढावा, जीडीपीची वाढ व्हावी की आणखीन काही ? याबाबत संशय निर्माण होतो आणि या सर्वांसाठी शेतकरी आपला अमूल्य, किमती वेळ वाया घालवत आहे व आवश्यकता नसतानाही त्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करत आहेत याचा साकल्याने विचार होणे आवश्यक आहे. **“ शासनाचे धोरण व शेतकऱ्याचे मरण ”** ही अवस्था आज शेतकऱ्यांची झालेली आहे.

शेतकरी आपल्या शेतात नवनवीन प्रयोग करून काही पदरात पडेल का ? यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यातील हुशार मंडळी आजही हवामानाने साथ दिली, बाजाराने हात दिला तर काही कमावत आहेत परंतु त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे, बाकी कोरडवाहू, अल्पभूधारक शेतकरी वर्ग हा तोट्याची शेती करून शहरी लाडक्या मध्यमवर्गीयांचे पोट भरण्यासाठी पदराला खार लावून शेतात राबत आहे. त्यातून मग कोणती पिके घ्यावीत, कोणत्या पद्धतीची शेती करावी याबाबत शेतीचा फार काही संबंध व ज्ञान नसलेली मंडळी वेगवेगळ्या शेती पद्धतीबाबत तारस्वरात मार्गदर्शन करत आहेत आणि शेतकरी स्वतः याबाबत खात्री करण्याइतपत सक्षम नाही, योग्य काय व अयोग्य काय ? याबाबत तो संभ्रमित आहे.

आज आपल्याकडे सेंद्रिय शेती, विना नांगरणीची शेती, विना मशागतीची शेती, झिरो बजेट शेती, विषमुक्त शेती, रासायनिक शेती, उच्च तंत्रज्ञान शेती, एकात्मिक शेती, रसायनमुक्त शेती ई. असे अनेक प्रकारच्या शेतीच्या पद्धतीबाबत वेगवेगळे शेतीतज्ञ, प्रगतशील शेतकरी कायमच प्रचार, प्रसार व मार्गदर्शन करत आहेत या सर्वांच्या गोंधळात नक्की कोणत्या शेती पद्धतीचा अवलंब करावा, उत्पादन खर्च कसा कमी करावा ? शेतीचे उत्पादन व उत्पन्न वाढविण्यासाठी कोणता पर्याय निवडावा ? आणि शेतकरी त्याला जसे जमेल आणि जेवढे उमजेल त्या पद्धतीने शेती करण्याचा प्रयत्न करत आहे परंतु शेवटी त्याच्या हातात काहीच राहत नाही. वरील कोणती पद्धत वापरावी जेणेकरून हाती काही शिल्लक राहील याबाबत ना कृषी विद्यापीठ, कृषी विभाग मार्गदर्शन करावयास तयार नाही, अशा वेळेस अल्प शिक्षित शेतकऱ्यांचा सुलभ, सोप्या पद्धतीने या सर्व पद्धतीची माहिती कोण देणार ? हा प्रश्न आहे. स्वतः शेतकऱ्यांनी आजच्या सायन्स आणि टेक्नॉलॉजी च्या युगात शेती ही वाचून, बघून, पाहून, ऐकूण व शिकून करावी लागेल हे कधी समजून घेणार आहेत ? केवळ बाजाराचे रेट्यामध्ये स्वतः झोकून देऊन जमेल तसे, जमेल तेवढे करून काहीही साध्य होणार नाही. त्यासाठी स्वतः शेतकऱ्यांनी वरील सर्व पद्धतीचा सखोल अभ्यास करून व सर्व यंत्रणांनी शेतकऱ्यांसाठी काय फायदेशीर आहे, याबाबत तांत्रिक माहिती द्यावी लागेल व त्यातून प्रत्येक शेतकऱ्यासाठी त्याच्या असलेल्या जमिनीचा प्रकार, तेथील हवामान, पाण्याची उपलब्धता, बाजाराची, ग्राहकांची गरज, शेतकऱ्याची आर्थिक क्षमता, उपलब्ध भांडवल यानुसार त्यास तंत्रज्ञानाचे पर्याय द्यावे लागतील. एकच एक पर्याय सर्व शेतकऱ्यांना लागू होणार नाही. वरील सर्व शेतीपद्धती मधील सर्व घटकांचा अभ्यास करून, शेतावर प्रयोग करून तज्ञ मंडळींनी ( पक्षी संशोधन संस्था ) प्रत्येक विभागातील शेतकऱ्यांसाठी पिकनिहाय पिकाचे उत्पादन मॉडेल ( Package Of Practices ) तयार करावे लागतील. हे काम तयार करत असताना जमिनीची मशागत, रासायनिक खतांचा वापर, कीडनाशके, मजुरांची

कमतरता, उपलब्ध पाणी, भांडवल यांचा योग्य तो ताळमेळ बसवून शास्त्रीय दृष्टिकोनातून वेगवेगळे पर्याय द्यावे लागतील. हे सर्व पर्याय पर्यावरण पूरक, शेतीवरील खर्च कमी करून, उच्च उत्पादन देणारे असावेत.

कोणतेही तंत्रज्ञान देत असताना ते कष्ट कमी करणारे, वापरण्यास सुलभ, स्वस्त व त्याची सहज उपलब्धता असणे आवश्यक असते तर शेतकरी ते तात्काळ अवलंबतील, या महत्त्वाच्या बाबी लक्षात ठेवून वेगवेगळ्या निविष्ठांचे, तंत्रज्ञानाचे पर्याय शेतकऱ्यांना द्यावेत. त्यातून शेतकरी निवडलेल्या पिकासाठीची गरज, माती, पाणी, भांडवल, हवामान काय योग्य आहे ते राजहंसासारखे निवडण्याची कला अवगत करून शेती करतील, करावी लागेल अन्यथा शेती, माती, पर्यावरण, सामाजिक असे असंख्य प्रश्न निर्माण होऊन अस्वस्थ, असुरक्षित, रोगी समाज पुढील 10 ते 15 वर्षात निर्माण होईल आणि ते सर्वांसाठी धोकादायक आहे यावर गांभीर्याने विचार करावा लागेल.

आज आपण उत्पादित करत असलेल्या फळे, भाजीपाला, धान्य, कडधान्य व मसाला पिकांचे उत्पादनात रसायनांचे अंश किती आहेत याबाबत कोणतेही प्रयोग, निष्कर्ष उपलब्ध नाहीत. सद्यस्थितीत शेतीमध्ये वापरण्यात येणाऱ्या रसायनांचा वापर वाढत असून त्यांचे अन्नातील उर्वरित अंश किती प्रमाणात आहेत याबाबत मोठ्या प्रमाणात शेतामधून, बाजारातून नमुने घेऊन त्याची तपासणी करून त्यात आढळणाऱ्या घातक रसायनाबाबत खात्री करून घेणे आवश्यक आहे. तशी कोणतीही योजना सद्यस्थितीत कार्यरत नाही. आज ( कृषी रसायनांचा ) अतिरेकी, अविवेकी, अनियंत्रित व अशास्त्रीय वापरामुळे सर्वच फळे, भाजीपाला, धान्य, कडधान्य व मसाला पिकांमध्ये अवशेष असण्याची दाट शक्यता आहे. त्यासाठी शिफारशी प्रमाणे ( Lable Claim ), शिफारशीतील मात्रेत कृषी रसायनांच्या विवेकी वापराबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षित करणे आवश्यक आहे, त्याच सोबत या कृषी रसायनास पर्यायी जैविक उत्पादने, सूक्ष्मजीवांचा वापर वाढवावा लागेल व त्याचे उत्पादन, वितरण, दर्जा व वापराबाबत शेतकऱ्यांना माहिती उपलब्ध करून द्यावी लागेल. कृषी रसायनांचे अन्नातील अंश व त्याचे धोके म्हणजेच मानव, प्राणी, पशुधन, माती, जलचर व पर्यावरणावर होणाऱ्या विपरीत परिणामाबाबत ग्राहक, शेतकरी व समाजास वेळीच सावध करणे गरजेचे आहे. म्हणजेच विषमुक्त (Residue Free) शेती पद्धती प्रथमतः आपणास करावी लागेल. त्याचे महत्त्व शेतकऱ्यांना, ग्राहकांना पटल्यावर त्याचा आग्रह होऊ शकतो, त्यातून एक निरोगी समाज निर्माण होईल.

विषमुक्त (Residue Free) शेती पद्धती वापरण्यामध्ये शेतकऱ्यांनी प्रावीण्य मिळवल्यावर त्या पुढचा टप्पा चांगल्या शेती पद्धती (Good Agriculture Practices) हा राहील. ज्यामध्ये शेतमाल निर्यातीसाठी तसेच स्थानिक बाजारात विक्री करताना शेतात शेतमाल उत्पादन वेळी काय पद्धती वापराव्यात यावर भर द्यावा लागेल. यामध्ये शेतात वापरावयाच्या निविष्ठा, कामाचे वेळी घ्यावयाची काळजी, मजुरांची सुरक्षितता, रसायने साठवणूक, हाताळणी व वापर याबाबतची कार्यपद्धती व पर्यावरण संरक्षणाचा विचार ध्यानात घेऊन शाश्वत शेती पद्धतीचा अवलंब करावा लागेल जेणेकरून मधल्या काळात झालेले पर्यावरणाचे नुकसान भरून निघेल व एक समृद्ध वारसा पुढच्या पिढीच्या हाती सोपवला जाईल. यातून एक समृद्ध, आरोग्यदायी समाज निर्मितीस चालना मिळेल. या उत्तम शेती पद्धती केवळ निर्यातीसाठी मर्यादित न राहता स्थानिक वापराचे अन्न ( फळे, भाजीपाला व धान्य ) निर्मितीसाठी वापरणे बाबत नियमन करावे लागणार आहे. यासाठी सर्व शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, समाज यांनी वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न करावे लागतील त्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण व इतर सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील.

उत्तम शेती पद्धतीचे पुढील टप्पा हा Tracebility चा असणार आहे. त्यामध्ये ग्राहक शेती उत्पादने विकत घेत आहेत त्या कोणत्या शेतातून आली आहेत, ही उत्पादने तयार करताना, हाताळणी करताना, प्रक्रिया करताना कोणत्या पद्धती वापरल्या आहेत व त्या मानवी आरोग्यास सुरक्षित आहेत याबाबतची खात्री द्यावी लागेल Tracebility मधून ग्राहकांना तो सेवन करत असलेल्या अन्नाची माहिती मिळणार आहे. यामुळे शेतमाल उत्पादन, प्रक्रिया व हे अन्न ग्राहकांचा डायनिंग टेबलवर पोहोचे पर्यंतचा झालेला प्रवास याबाबत पारदर्शकता येऊन एकमेकांबाबत विश्वास निर्माण होणार आहे.

आपल्या देशाचे 147 कोटी जनतेस पुरेसा व सकस अन्न पुरवठा करावयाचा असेल तर अन्न निर्मितीसाठी कृषी क्षेत्रातील रसायनांचा डोळसपणे वापर अपरिहार्य आहे. त्यामुळे कृषी रसायनांचा वापर करत विषमुक्त शेती करावी लागेल. जिथे शक्य आहे त्या ठिकाणी व ज्या पिकामध्ये शक्य आहे त्या पिकामध्ये सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करावा लागेल. सद्यस्थितीत शेतकरी सुरुवातीस नमूद केलेल्या वेगवेगळ्या शेती पिक पद्धतीमुळे गोंधळलेल्या अवस्थेत आहे. त्यांस एक शास्त्रीय विचार देऊन एकात्मिक शेती पद्धती अवलंब करून सुरुवातीला विषमुक्त शेती (Residue Free) त्यानंतर उत्कृष्ट शेती पद्धती (Good Agriculture Practices) त्या पुढील टप्पा हा Tracebility व शेवटचा टप्पा हा सेंद्रिय शेती या क्रमाने मार्गक्रमण करावे लागेल त्यातून शेतकरी प्रशिक्षित होऊन ग्राहकांस आरोग्यदायी अन्नपुरवठा होऊ शकेल.

सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती, झिरो बजेट शेती, शून्य मशागत शेती, कमीत कमी मशागत शेती पद्धती, ऋषी – कृषी, एकात्मिक शेती पद्धती, विषमुक्त शेती या शेती पद्धती त्यांचे त्यांचे जागी बरोबर असतीलही पण सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी त्यांना समजेल ती, झेपेल ती, परवडणारी शेती पध्दती व नफा मिळवून देणारी शेती पध्दतीची गरज आहे. या सर्व शेती पद्धतीतील चांगल्या बाबी शेतकऱ्यांनी घ्याव्यात. त्यासाठी प्राथमिक विचार हा असायला हवा की मी ज्या काही बाबी अवलंबणार आहे त्यामुळे माझा उत्पादन खर्च कमी होणार आहे का ? माझे कष्ट कसे कमी होईल का ? पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, ना ? उत्पादनामध्ये वाढ होईल का ? म्हणजेच निसर्गास पुरक, आरोग्यदायी, शेतकऱ्यांना नफा मिळवून देणारी शेती पद्धती अवलंबावयाची आहे आणि ते कधी शक्य होईल तर वरिल सर्व पद्धतीची माहिती घेऊन, काळाच्या कसोटीवर घासून प्रत्यक्षात अनुभवातून शेती करावी लागणार आहे. प्रत्येक शेती पद्धतीचे फायदे तोटे आहेत त्याचा सारासार विचार करून **" ज्ञानाची शेती "** हा एकमेव शाश्वत पर्याय निवडणे सर्वांसाठी फायद्याचे ठरणार आहे.